Newspaper: Maharashtra Times

Article Date: 03rd April 2018

Article Regarding 50th Youth Festival Celebration

सुवर्ण यशोगाथा

विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याचं हक्काचं व्यासपीठ म्हणजे मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव. यंदाचं युवा महोत्सवाचं हे ५०वं वर्ष होतं. या युवा महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच कलिना कॅम्पसमध्ये पार पडला. त्यानिमित्त 'सुवर्ण युवा'च्या विजयवीरांचा घेतलेला हा आढावा...

शाल्मलीची 'मेनका'वर मोहोर

कथक या शास्त्रीय नृत्यप्रकारात सर्वोत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थिनीला युवा महोत्सवाची मानाची 'मेनका ट्रॉफी' देऊन गौरवण्यात येतं. यंदाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात हा मान पटकावलाय सायनच्या एसआयइएस कॉलेजच्या शाल्मली झंकार हिनं. युवा महोत्सवात सहभागी व्हायचं हे शाल्मलीनं अकरावीत असतानाच ठरवलं होतं. परंतु पदवीच्याच विद्यार्थ्यांना युवा महोत्सवात सहभागी होता येतं. त्यामुळे शाल्मलीनं दोन वर्षं आपल्या सीनिअर्सबरोबर कसून सराव केला. गेली सोळा वर्षं मनीषा जीत यांच्याकडून शाल्मली शास्त्रीय नृत्याचे धडे गिरवत आहे. बीएमएमच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असलेल्या शाल्मलीनं रोजचा अभ्यास आणि नृत्याचा सराव यांची योग्य सांगड घालत हे यश संपादन केलं आहे. यापूर्वी शाल्मलीला कथकसाठी भारत सरकारची विशेष स्कॉलरशिपही मिळाली आहे. तसंच अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत अनेक बक्षिसांवर तिनं आपलं नाव कोरलं आहे. या सगळ्या प्रवासात आई-वडील आणि कॉलेजच्या प्राध्यापकांचा खूप मोठा पाठिंबा होता. तसंच सरावाच्या पहिल्या दिवसापासून ते अगदी ही मानाची 'मेनका' हातात येईपर्यंतचा हा प्रवास खूप अविस्मरणीय आहे. यापूर्वी अनेक बक्षिसं मिळूनसुद्धा मेनका ट्रॉफी माझ्यासाठी आणि आमच्या कथक कुटुंबासाठी खूप जास्त खास आहे. आता माझी जबाबदारी अजून वाढली असून मेनकाचा बहुमान मी येत्या काळात नक्कीच कायम राखीन', असं शाल्मलीनं 'मुंटा'शी बोलताना सांगितलं.

मूकाभिनय ठरला सरस

पोदार कॉलेजच्या संदेश रामराजेनं सुवर्ण युवा महोत्सवात 'मिस्टर युनिव्हर्सिटी'चा किताब पटकावला आहे. शाळेत असल्यापासूनच तो विविध कला स्पर्धांमध्ये सहभाग घ्यायचा. कॉलेजला गेल्यावर त्यानं मुकाभिनयात विशेष प्राविण्य मिळवलं. 'मिस्टर युनिव्हर्सिटी' स्पर्धेच्या विविध फेऱ्यांपैकी अभिनयाच्या फेरीत संदेश उजवा ठरला. स्पर्धेच्या काळात अभ्यास आणि कला दोन्ही गोष्टी संदेशनं उत्तम सांभाळल्या. कॉलेजचे प्राचार्य, मित्रमंडळी आदींचा त्याला पाठिंबा असल्याचं तो सांगतो. 'मिस्टर युनिव्हर्सिटीचा किताब पटकावण्याचं स्वप्न खूप आधीपासून पाहत होतो. स्पर्धेच्या सगळ्या फेऱ्या उत्तम पार पडल्यानंतर निकालाची खूप उत्सुकता होती. त्यामुळे हा किताब मिळाल्याचा खूप आनंद आहे. या फेऱ्यांमधून खूप गोष्टी नव्यानं शिकता आल्या. यापुढेही माझी अनेक स्वप्नं आहेत जी मिळवायला मला या अनुभवाचा नक्कीच उपयोग होईल. हे यश माझं एकट्याचं नसून सर्वांचं आहे', असंही तो सांगतो.

पोदारची 'गोल्डन' जोडी

जास्तीत जास्त स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या आणि जिंकणाऱ्या विद्यार्थ्याला 'गोल्डन बॉय ' तर विद्यार्थिनीला 'गोल्डन गर्ल ' हा किताब देऊन गौरवण्यात येतं. यंदा हा बहुमान पोदारच्या जोडीला मिळाला आहे. वैष्णवी पाठक आणि शंतनु रांगणेकर असं या विद्यार्थ्यांचं नाव आहे. 'यंदा मी फोक डान्स, फोक ऑर्केस्ट्रा, थिएटर मध्ये हिंदी, मराठी स्किट, मराठी एकांकिका आदी इव्हेंट्समध्ये होते. पण हे सगळं करत असताना कलिनाला एमए जर्मनचे लेक्चर्स देखील सुरु होते. सकाळपासून रात्रीपर्यंत तालमी आणि अभ्यास यांची सांगड मी घालत होते. सुवर्ण युवा महोत्सवाच गोल्डन गर्ल बनण हे माझ स्वप्न होत आणि ते साकार झाल्यामुळे खूप आनंद झाला आहे' वैष्णवी पाठक(गोल्डन गर्ल) सांगते. तर आपल्या यशामागचं गुपित सांगताना शंतनु रांगणेकर (गोल्डन बॉय) सांगतो की,' सिनियर असल्यामुळे टिम तयार करणे ही जबाबदारी होती. सर्व जण मिळून मिसळून राहतील याची काळजी घ्यावी लागत होती. स्किट मध्ये जोक झाला की मी फुटायचो माझा हसण्यावर ताबाच नव्हता,मग तालीम थांबायची. गमतीजमती व्हायच्या. या सर्व प्रोसेस मध्ये खूप मज्जा केली. मी टीवायचा अभ्यास, जी.एस चे पद हे सर्व सांभाळले आणि मेहनतीच फळ देखील मिळाले.

अभ्यास-इव्हेंट्सची सांगड

मिस युनिव्हर्सिटीचा मान मिठीबाई कॉलेजच्या इमॉन चौधरीला मिळाला. 'कॉलेजमधून जॅकपॉटमध्ये सहभागी होऊन व्यवस्थापन, वैद्यकीय, क्रीडा, सांस्कृतिक या सर्व विभागांत मी उत्तमरित्या काम करत होते. यावर्षी वेगवेगळ्या इव्हेंट्समध्ये सहभागी झाले होते. माझ्या घरी सांस्कृतिक वातावरण असल्यामुळे एसवाय बीएचा अभ्यास आणि इव्हेंट्स याची योग्य सांगड घालता आली. मिस युनिव्हर्सिटी होणं ही माझ्यासाठी खूप आनंदाची बाब आहे. एका दिवशी माझे दोन-दोन इव्हेंट्स असायचे. अनेकदा तर दोन कलाप्रकारात बराच फरक असायचा. माझ्या संपूर्ण टीमनं यामध्ये मला खूप मदत केली', असं इमॉन चौधरी सांगते.

यंदा युवा महोत्सवाचं पन्नासावं वर्ष होतं. त्यामुळे अनेक नवीन गोष्टी या वर्षात घडल्या. विद्यार्थ्यांमध्ये एक निराळाच उत्साह दिसून आला. स्पर्धा दर्जेदार झाल्याच, पण ह्या स्पर्धांनी अनेक चांगले कलावंत घडवले. यंदा प्रथमच अंतिम फेऱ्या फक्त मुंबईत न होता विविध जिल्ह्यांमध्ये झाल्या. तिथल्या कॉलेजांमधून त्यांना चांगला प्रतिसाद होता.

- डॉ. सुनिल पाटील,
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

युवा महोत्सवात सहभागी झालेले सर्वच विद्यार्थी एकाहून एक सरस असे होते. राज्यस्तरावरही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून विद्यापीठाचं नाव उंचावलं आहे. पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर जो विश्वास ठेवला त्यामुळे, तसंच अनेक कॉलेजांनी दिलेल्या पाठबळामुळे यंदाचा सुवर्णमहोत्सवी युवा महोत्सव दिमाखात पार पडला. मुंबई विद्यापीठाचा माजी विद्यार्थी म्हणून मला याचा अभिमान वाटतो.

- नीलेश सावे, सांस्कृतिक समन्वयक

आम्ही विजेते...

- ओव्हरऑल चॅम्पियन (प्रथम)- पोदार कॉलेज
- द्वितीय क्रमांक - व्ही.जी. वझे कॉलेज
- तृतीय क्रमांक - रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
- चौथा क्रमांक - रुपारेल कॉलेज, विवा कॉलेज
- पाचवा क्रमांक- जे. जे. स्कूल ऑफ आर्किटेक्चर, अण्णासाहेब वर्तक कॉलेज
- संगीत विभाग, नाट्य विभाग - पोदार कॉलेज
- लिटररी आर्टस् विभाग - रुपारेल कॉलेज
- नृत्य विभाग - एस.एम. शेट्टी कॉलेज, विवा कॉलेज, के.डी.बी कॉलेज
- फाईन आर्टस् विभाग - सर जे.जे स्कुल ऑफ आर्टस्

विशेष पुरस्कार

- सुधीर यार्डी स्मृती पुरस्कार- पोदार कॉलेज
- गरवारे पुरस्कार- मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स
- भाऊसाहेब वर्तक पुरस्कार- इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ
- वर्ल्ड बुक पुरस्कार- गव्हर्नमेंट लॉ कॉलेज
- जगत पाटील सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार- शंतनू रांगणेकर, पोदार कॉलेज
- इंदुमती लेले पुरस्कार- एस.एम. शेट्टी कॉलेज, विवा कॉलेज, के.डी.बी कॉलेज

संकलन- मंजिरी पोखरकर, देविका जोशी
फोटो- रामेश्वर जगदाळे